## प्रेसनोट

मंडळ अधिकारी कार्यालय, कसाल ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग येथील मंडळ अधिकारी लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सिंधुदुर्ग |
| गुन्हा नोंद क्रमांक | |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. संदीप पांडुरंग हांगे, मंडळ अधिकारी कसाल, कुडाळ उपविभाग, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ४,०००/— रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/— रूपये |

थोडक्यात हकिकत —

तक्रारदार यांनी गाव मौजे अणाव हुमरमाळा येथील श्री. उल्हास वामन पालव यांची सर्वे नं. १७७०, ही जमिन कायदेशीर रित्या खरेदी केलेली आहे. सदर खरेदी खताची सातबारा/फेरफार नोंद होणेकरीता त्यांनी त्यांची फाईल तलाठी कार्यालय अणाव येथे दिली. त्यानंतर तेथील तलाठी यांनी सदरची फाईल श्री. हांगे, मंडळ अधिकारी कसाल यांचेकडे देण्यास तक्रारदार श्री. परब यांचेकडे दिली. दिनांक २८/०१/२०२१ रोजी तक्रारदार हे मंडळ अधिकारी कसाल श्री. हांगे यांना भेटले असता त्यांनी खरेदी खताची नोंद मंजुर करणेकरीता १०,०००/- रू. द्यावे लागतील असे सांगून तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार श्री. परब यांनी दिनांक १०/०२/२०२१ रोजी ला.प्र.वि. सिंधुदुर्ग यांचेकडे दिली.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ११/०२/२०२१ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लोकसेवक हांगे, मंडळ अधिकारी कसाल हे लाचेची मागणी करतात अगर कसे याबाबत पडताळणी केली असता लोकसेवक हांगे यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४०००/- रू. लाच स्विकारण्यास संमती दर्शवुन कार्यालयात येण्यापुर्वी फोन करा असे सांगितले.

वरीलप्रमाणे पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने लोकसेवक हांगे, मंडळ अधिकारी कसाल यांचेविरूध्द दिनांक १६/०२/२०२१ रोजी लाचेचा सापळा आयोजीत केला असता, लोकसेवक श्री. संदीप हांगे, मंडळ अधिकारी कसाल, ता. कुडाळ यांना लाच रक्कम रू. ४०००/- पंचासमक्ष स्विकारल्याने लोकसेवक श्री. हांगे यांना १२.१० वा. रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे, कार्यालय कुडाळ
तहसीलदार कार्यालय कुडाळ समोर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, ४१६५२०

संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई—मेल :— dyspacbsindhudurga@gmail.com

ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री नंबर :— १०६४

दुरध्वनी क्र. :— ०२३६२—२२२२८९

16/02/2021

(मितीश केणी)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग